R.T.M.U. Nanded, Sub-Centre, Peth
5817
LIBRARY
'S :: LATUR ::

# १

# ऑगस्त कॉम्त

(१७९८ – १८५७)

(Auguste Comte)



समाजशास्त्राचा पद्धतशीर अभ्यासाला १९ व्या शतकात सुरुवात झाली. त्यासाठी संघटित प्रयत्न करून समाजशास्त्राच्या अभ्यासाला नवीन वळण व दिशा दाखविण्याचे श्रेय फ्रेंच विचारवंत ऑगस्त कॉम्त यांचेकडेच जाते.

वर्तमान समाजाच्या उत्क्रांतीतील फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांती या दोन घटनांना अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे एका नवीन युगाचा प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांतीमुळे यंत्रसत्ता व नवीन शास्त्रीय शोध यामुळे सामाजिक जीवनात अनेक आमुलाग्र असे बदल घडून येवू लागले. औद्योगिक उत्पादन व्यवस्था व वाढती वेगवान दळणवळणाची साधने यामुळे सामाजिक गतिमत्वाचा वेग शीघ्रगतीने वाढला. भौतिक क्षेत्रात वेगवान प्रगती होत असली तरी सामाजिक जीवनात नानाविध समस्या निर्माण होवू लागल्या. अशा समस्यांच्या निराकरणासाठी उपाययोजनांच्या दृष्टीने मार्गदर्शकांची अत्यंत आवश्यकता जाणवू लागली. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या लोकशाही मूल्यांना अधिक चालना मिळू लागली. व्यक्ती व समाजविकासाच्या संकल्पना शीघ्रतेने विकसित होवू लागल्या. त्या काळात सामाजिक व राजकीय क्षेत्रात झालेला बदल हा भविष्यकालीन नवसमाजनिर्मितीसाठी उपयुक्त होता. परंतु सामाजिक क्षेत्रात झालेल्या बदलामुळे ज्या समस्या निर्माण झाल्या त्याचे निर्मूलन करून समाजसुधारणेची संकल्पना अनेक विचारवंतांच्या विचारातून उत्तेजित होवू लागली. जीवनाच्या विविध क्षेत्रात शास्त्रीय अध्ययने होवू लागली. अशा सर्व अध्ययनात समायोजन घडवून आणण्याची गरज होती. हीच गरज ओळखून फ्रेंच विचारवंत व तत्वज्ञ ऑगस्त कॉम्त यांनी ती जबाबदारी स्वीकारली. समाजशास्त्राच्या अभ्यासाला नवीन वळण लावण्याचे महान कार्य त्यांनी केले. शास्त्राच्या वर्गीकरणाचे नवीन तत्व त्यांनी मांडला. समाजशास्त्रास 'विज्ञानाचा' दर्जा प्राप्त करून देण्याचे महान कार्यसुद्धा त्यांचेच. तयार करून शास्त्रा-शास्त्राचा परस्परसंबंध त्यांनी दर्शविला. मानवी ज्ञानाच्या प्रगतीचा आलेख म्हणूनच त्यांना समाजशास्त्राचे जनक मानले जाते.

**ऑगस्त कॉम्त यांचा जीवनवृत्तांत :**

ऑगस्त कॉम्त यांचा जन्म १९ जानेवारी १७९८ रोजी दक्षिण फ्रान्समधील मान्टपेलियर (Montpellier) या शहरात झाला. त्यांचे वडील फ्रेंच शासनात कर विभागामध्ये करवसुली अधिकारी होते. तसेच त्यांचे आईवडील राजभक्त होते. कॉम्तचे प्राथमिक शिक्षण हे त्यांच्या जन्मगावातच झाले. कॅथॉलिक पंथाच्या घराण्यात त्यांचा जन्म झाल्यामुळे कॅथॉलिक पंथाचा प्रभाव त्यांच्या विचारावर पडलेला दिसून येतो. परंतु लहानपणापासूनच त्यांची विचारसरणी स्वतंत्र असल्यामुळे विद्यार्थीदशेत एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा गौरव केला जात होता. लहानपणापासूनच कॉम्तच्या व्यक्तिमत्वामध्ये बौद्धिक क्षमता आणि प्रस्थापित सत्तेला विरोध करणे हे दोन विलक्षण गुण दिसून येत होते. इ.स. १८१४ मध्ये कॉम्तने पॅरिस शहरातील त्या काळी नावाजलेल्या 'इकॉल पॉलिटेक्निक' (Ecola Poly-technique) या शिक्षणसंस्थेत प्रवेश घेतला. या संस्थेतच कॉम्तवर अनेक तत्कालीन विचारवंतांच्या विचारांचा पगडा बसला. याचे प्रत्यंतर आपल्याला त्यांच्या सामाजिक विचारात दिसून येते. या संस्थेतच त्यांचा संबंध बेंजामिन फ्रँकलिन (Benjamin Franklin) या विचारवंताच्या सान्निध्यात आला. त्यांच्या विचारांमुळे कॉम्त फार प्रभावित झाले.. ते कॉम्तसाठी आदर्श पुरुष ठरले. लहानपणापासूनच कॉम्तची विचारसरणी स्वतंत्र असल्यामुळे विद्यार्थीदशेत एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा गौरव केला जात होता. तर्कशुद्ध विचार करण्याची पात्रता त्यांच्या अंगी जोडलेली असल्यामुळे रूढी, परंपरा व अंधश्रद्धा यावर त्यांचा विश्वास नव्हता. तेरा वर्षांचे असतानाच त्यांनी आपल्या कुटुंबाच्या राजकीय व धार्मिक विचारांचा त्याग केला होता. वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच राज्यशास्त्र व तत्वज्ञान या विषयात ते अधिक रुची घेवू लागले. समाजाचे पुनर्निर्माण करण्याचा विचार त्यांच्या मनात येवू लागला. या स्वतंत्र विचारशक्तीमुळे १७८९ सारखी क्रांती फ्रान्समध्ये पुन्हा घडावी व राजकीय क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून यावेत असे त्यांना वाटत होते.

१८१६ मध्ये इकॉल पॉलिटेक्निक ही शिक्षण संस्था बंद पडली. त्यामुळे निराश होवून कॉम्त आपल्या जन्मगावी परत गेले. परंतु तेथेही त्यांचे मन रमत नव्हते. म्हणून जुलै १८१६ मध्ये ते पॅरिसला आले. तेथे गणिताचा शिक्षक म्हणून शिकवण्या करून आपला उदरनिर्वाह चालवू लागले. याच काळात १८१८ मध्ये कॉम्तचा प्रसिद्ध फ्रेंच विचारवंत हेन्री-डी-सेंट सायमन यांच्याशी संबंध आला. सेंट सायमन यांच्या विचाराने कॉम्त फारच प्रभावित झाले. काही दिवस सेंट सायमनचा सचिव म्हणून कॉम्तने काम केले. कॉम्तने आपल्या लेखनात वापरलेल्या बऱ्याच संज्ञा सेंट सायमनकडून घेतलेल्या आहेत. १८१८ ते १८२४ पर्यंत त्यांचा खूप घनिष्ट संबंध होता. सायमनने चालविलेल्या 'Industric' या नियतकालिकामधून कॉम्तने १८१९ ते १८२४ या काळात अनेक लेख व निबंध लिहिले. त्यावरच आपले जीवन काढण्यास त्यांनी सुरुवात केली. आर्थिक व कौटुंबिक अडचणींना कंटाळून आत्महत्या करण्याचा विचार त्यांच्या मनात डोकावत होता. परंतु त्यावर मात करून आपले समाजशास्त्रीय विचार त्यांनी तसेच पुढे ठेवले.

LIBRARY 5817



सन १८२५ मध्ये कॅरोसिन मॅसिन या महिलेसोबत कॉम्तचा विवाह झाला. परंतु त्यांचे वैवाहिक जीवन सुखी होवू शकले नाही. १८४२ मध्ये कॉम्तने आपल्या पत्नीपासून घटस्फोट घेतला. विवाहानंतर लगेच १९२६ मध्ये आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी पॅरिस शहरात कॉम्तने भाषणाची एक मालिका तयार केली होती. परंतु दुर्दैवाने याच काळात कॉम्तला मनोविकृतीचा तीव्र झटका आल्याने भाषणाची मालिका ही तशीच अर्धवट सोडून द्यावी लागली. १८२८ मध्ये स्वास्थ्यात सुधारणा झाल्यावर त्यांनी पुन्हा व्याख्याने देण्यास सुरुवात केली. १८३० मध्ये 'The Course of Positive Philosophy' या त्यांच्या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला. हा ग्रंथ सहा खंडात लिहिण्यात आला.

पुन्हा नव्याने सुरू झालेल्या ''इकॉल पॉलिटेक्निक'' या संस्थेत १८३२ ते १८४२ या काळात कॉम्तने प्रथम ट्युटर व नंतर परीक्षक म्हणून काम केले. परंतु तेथेही अधिकाऱ्यांशी न पटल्यामुळे कॉम्तला आपली नोकरी व त्याद्वारे उत्पन्न यावर पाणी सोडावे लागले. १८४२ मध्ये कॉम्तने आपल्या पत्नीशी घटस्फोट घेतल्यानंतर १८४५ मध्ये त्यांचा क्लाटिड-द-वाक्स (Clotidede-Vaux) या महिलेशी भावनात्मक घनिष्ठ संबंध आला. श्रीमती वाक्स यांचा कॉम्तच्या राहणीमान आणि विचारावरसुद्धा बराच प्रभाव पडला. त्या दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. परंतु कॉम्तच्या दुर्दैवाची गोष्ट अशी की, त्यांचे प्रेमसंबंध निर्माण झाल्यावर एका वर्षातच ती स्त्री मरण पावली. कॉम्त पुन्हा एकदा उदास झाले. त्यांची आर्थिक परिस्थिती नेहमीच वाईट राहिली. गणिताच्या शिकवण्यावरच ते आपला उदरनिर्वाह चालवित असे. त्यांच्या प्रकाशित निबंधामुळे ब्रिटनमधील विचारवंत त्यांच्या विचारांकडे आकर्षित झाले व त्यांनी काही आर्थिक मदतही केली तर काहींनी त्यांचे शिष्यत्वही स्वीकारले. जसे इंग्लंडचा प्रसिद्ध विचारवंत जॉन स्टुअर्ड मिल यांनी १८४५ मध्ये १२०० डॉलरची रक्कम वर्गणीच्या स्वरूपात गोळा करून कॉम्तला पाठविली होती.

ऑगस्त कॉम्त हे उदास मनोवृत्तीचे, कृतज्ञ व स्वयंकेंद्रित असे होते. परंतु त्यांनी मानवतेच्या कल्याणासाठी संपूर्ण आयुष्यभर प्रयत्न केले. आपल्या विचारांचा अधिकाधिक प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने १८४८ मध्ये त्यांनी ''Sociate Positivistic' नावाची संस्था पॅरिसमध्ये स्थापन केली व तिच्या शाखा अमेरिका, ब्रिटन, स्पेन इत्यादी राष्ट्रात उघडल्या. आपल्या कल्पनांना वास्तव रूप देवून मानवी जीवनाचा विकास करण्यासाठी कॉम्तने आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले. त्यांनी प्रत्यक्षवादासंबंधी मांडलेले विचार चिंतनीय आहेत. अशा समाजशास्त्राचा जनक ठरलेल्या महान सामाजिक तत्त्ववेत्त्याचे ५ सप्टेंबर १८५७ रोजी दुःखद निधन झाले.

**कॉम्तची ग्रंथसंपदा :**

ऑगस्त कॉम्तने आपल्या जीवनकाळात अनेक विचारप्रवर्तक ग्रंथ लिहिले असून त्यातील काही महत्त्वाच्या लिखाणाचा आपण पुढीलप्रमाणे विचार करू.

(१) १८१८ ते १८२४ या काळात ऑगस्त कॉम्त यांनी आपले विचार निबंध व लेख या स्वरूपातून सिमाँ या विचारवंतांनी चालविलेल्या ''Industire' या नियतकालिकातून प्रसिद्ध केले.

(२) १८२२ मध्ये कॉम्तने आपले पहिले पुस्तक "A Plan for Scientific World Necessary to Re-Organize Society" प्रसिद्ध केले. या पुस्तकामुळेच खऱ्या अर्थाने कॉम्तच्या कुशाग्र बुद्धिमत्तेची चुणूक सर्वांना दिसून आली. या पुस्तकाला कॉम्तला गुरुस्थानी असलेले सुप्रसिद्ध विचारवंत हेन्री-डी-सेंट सायमन यांची प्रस्तावना लाभली.

(३) १८२६ मध्ये कॉम्तचे दुसरे पुस्तक "Considerations on Spiritual Power" प्रसिद्ध केले.

(४) १८३० ते १८४२ पर्यंतच्या काळात "Course of Positive Philosophy" हे महत्त्वपूर्ण ग्रंथ एकूण सहा खंडात प्रकाशित झाले. या ग्रंथाच्या लिखाणासाठी कॉम्तने तब्बल १२ वर्षे व्यतीत केली असून त्याचा पहिला खंड १८३० मध्ये तर सहावा खंड १९४२ मध्ये प्रकाशित झाला.

(५) १८४४ मध्ये कॉम्तने 'System de Politique Positive" (विज्ञानवादी राजकीय नीतीचे सिद्धांत) या ग्रंथाचा आराखडा तयार करून तो ग्रंथ १९५१ ते १८५४ या काळात चार खंडात प्रकाशित झाला.

वरील ग्रंथांशिवाय कॉम्तने इतरही अनेक ग्रंथ लिहिलेत. त्यातील महत्त्वपूर्ण ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत.

(1) Discourse of Positive Spirit (1844)
(2) Positivist Clander (1849)
(3) Positivist Library (1852)
(4) Appeel to Conservatives (1855)
(5) System of Positive Logic (1856) .

**कॉम्तच्या विचारांवर पडलेले प्रभाव :**

कोणत्याही महान व्यक्तीच्या विचारांची घडण ही एकांगी नसते, तर त्यावर अनेक विचार व घटनांचा तो परिपाक असतो. ऑगस्त कॉम्तसुद्धा त्याला अपवाद नाही. त्याच्या विचारावर पडलेले प्रभाव पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) इ.स. १८१७ मध्ये कॉम्तचा हेन्री सेंट सायमन (H. Saint Simon) या वयोवृद्ध उमराव घराण्यातील फ्रेंच विचारवंत यांच्याशी परिचय झाला. सायमन आणि कॉम्त यांचा खूप घनिष्ठ संबंध येवून तो १८१८ ते १८२४ पर्यंत राहिला. सेंट सायमनने चालविलेल्या 'Industrie' या नियतकालिकातून कॉम्तने अनेक लेख व निबंध लिहिले. सेंट सायमन हे सुधारणावादी कार्याचे पुरस्कर्ते असून त्यांचा कार्याचा फार मोठा प्रभाव कॉम्तवर पडलेला दिसून येतो. कॉम्त हे सुधारणावादी कार्यासंबंधीच्या विचारांकडे आकर्षित झाल्यामुळेच त्या दोघांमध्ये घनिष्ठ मैत्री निर्माण झाली होती.

परंतु १८२४ मध्ये सायमन व कॉम्त यांच्यात वैचारिक मतभेद निर्माण झाले. सायमनने प्रत्यक्षात समाजसुधारणेच्या कार्यावर भर दिला, याउलट कॉम्तच्या मते, कोणताही समाजसुधारणावादी कार्यक्रम प्रथमतः तात्विक विचारावर अवलंबून असतो. त्यामुळे सायमनचा

प्रत्यक्षकार्यवादी दृष्टिकोन आणि कॉम्तचा वैचारिक अथवा तात्विक दृष्टिकोन असा फरक पडू लागल्यामुळे त्या दोघात तीव्र मतभेद होवू लागले.

(२) जीवनातील आर्थिक व कौटुंबिक विवंचनेमुळे कॉम्तच्या निराशावादी वृत्तीवर परिणाम झालेला दिसून येतो. आर्थिक व कौटुंबिक अडीअडचणींना कंटाळून आत्महत्या करण्याचा विचार त्यांच्या मनात डोकावत होता.

(३) कॉम्तने स्वीकारलेली प्रगतीची कल्पना टर्गोट व कॉडर्स यांच्याकडून घेतलेली आहे. मानवाच्या बौद्धिक विकासाला कोणत्याच प्रकारच्या मर्यादा नसल्यामुळे या विकासाला कोणीही थोपवू शकत नाही. बौद्धिक विकास अथवा प्रगती अपरिहार्य असली तरी सर्वच क्षेत्रात विकासाची गती सारखी असत नाही या टर्गोटच्या विचारसरणीशी कॉम्त सहमत होते.

(४) कॉम्तची नियतवादाची (Determinism) संकल्पना माँटेस्क्यू या विचारवंताकडून स्वीकारलेली आहे. त्यामुळे मानवसमाज नियततत्त्वाप्रमाणे उत्क्रांत होत जातो यावर कॉम्तचा विश्वास होता.

(५) उदारमतवादी विचारवंत व अर्थशास्त्रज्ञ ॲडमस्मिथ यांच्या अर्थशास्त्रीय विचारांशी कॉम्तचे विचार जुळणारे होते. ''औद्योगिक समाजातील श्रमविभाजनाचे तत्त्व हे सामाजिक सहकार्याचे प्रभावी स्वरूप आहे.'' या स्मिथ यांच्या विचारांशी कॉम्तचे विचार मिळतेजुळते दिसून येतात.

(६) औद्योगिक क्रांती व फ्रेंच राज्यक्रांती यामुळे कॉम्तच्या वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञानास (Positive Philosophy) अधिक चालना मिळाली. १७८९ सारखी राज्यक्रांती फ्रान्समध्ये पुन्हा घडावी व राजकीय क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून यावा असे कॉम्तला मनोमन वाटत होते.

## समाजशास्त्राचा जनक - ऑगस्त कॉम्त

## (Father of Sociology - Auguste Comte)

ऑगस्त कॉम्तला समाजशास्त्राचा जनक म्हणून संबोधले जाते. 'समाजशास्त्राचा जनक' ही उपाधी कॉम्तला कशी मिळाली हे पाहणेसुद्धा मनोरंजक आहे. कॉम्तने आपल्या विज्ञानवादी दर्शन मार्ग (The Course of Positive Philosophy) हा ग्रंथ सहा खंडामध्ये १८३० ते १८४२ या काळात प्रसिद्ध केला. या ग्रंथाच्या पहिल्या तीन भागात समाजशास्त्रासाठी ''सामाजिक भौतिकशास्त्र'' (Social Physique) या संज्ञेचा वापर केला होता. परंतु नंतर ही संज्ञा बदलण्याचा प्रसंग कॉम्तवर आला. त्याचे कारणही मनोरंजकच आहे. सन १८३५ मध्ये क्विटलेट (Quetelet) या बेल्जियम आकडेशास्त्रज्ञाने (Statistician) 'सामाजिक भौतिकशास्त्र' या शीर्षकाचा परंतु वेगळ्या संदर्भाचा व वेगळ्या विषयाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यामुळे समाजशास्त्रासाठी 'सामाजिक भौतिकशास्त्र' ही वापरण्यात येणारी संज्ञा बदलण्याशिवाय कॉम्तजवळ दुसरा पर्यायच उरला नव्हता. १८३८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'The Course of Positive Philosophy' या ग्रंथाच्या चौथ्या भागात कॉम्तने 'समाजशास्त्र' (Sociology) या संज्ञेचा उपयोग केला. इंग्रजीतील 'Sociology' हा शब्द ग्रीक व लॅटिन भाषेच्या संकरातून

जन्माला आला. ग्रीक भाषेतील 'Socius' आणि लॅटिन भाषेतील 'Logos' या दोन शब्दांच्या एकत्रिकरणातून अथवा शब्दसंकरातून 'Sociology' (समाजशास्त्र) हा इंग्रजी शब्द तयार झाला. ग्रीक भाषेतील 'Socius' या शब्दाचा अर्थ 'समाज' असा आहे तर लॅटिन भाषेतील 'Logos' या शब्दाचा अर्थ 'शास्त्र' किंवा 'विज्ञान' असा आहे. म्हणूनच 'Sociology' (समाजशास्त्र) या शब्दाचा अर्थ ''समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र'' (Science is the Study of Society) असा घेतला जातो. अशाप्रकारे कॉम्तने सर्वप्रथम 'Sociology' या शब्दाचा उपयोग केल्यामुळे व त्याला समर्पक संकल्पना मांडल्यामुळे स्वाभाविकतःच समाजशास्त्राचे जनकत्व ऑगस्त कॉम्तकडे जाते. कॉम्तचे शिष्य जॉन स्टुअर्ट मील आणि इतर इंग्लिश शिष्यांना समाजशास्त्रासाठी वापरलेला 'Sociology' हा शब्द जरी प्रथमतः योग्य वाटला नसला तरी नंतर मात्र त्या शब्दाला सर्वत्र मान्यता मिळाली.

या संदर्भातील काही टीकाकारांच्या मते, कॉम्तने 'समाजशास्त्र' हे नवीन शास्त्र निर्माण केले नसून फक्त एका वेगळ्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शास्त्राचे नामकरण करून केवळ एक नामकरण विधी साजरा केला. टीकाकारांची टीका काहीशी मान्य केली, तरी या वास्तविक गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही की, 'Sociology' ही संज्ञा कॉम्तने सर्वप्रथम वापरली तसेच समाजशास्त्राच्या अभ्यासाला सुव्यवस्थित स्वरूप देण्याचे प्रयत्न केले यात कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. त्यामुळे 'समाजशास्त्राचा जनक' म्हणून कॉम्तला दिलेली उपाधी संयुक्तिक व आवश्यकही आहे.

**कॉम्त यांचे समाजशास्त्रीय विचार :**

**(Thought of Compte on Sociology) :**

औद्योगिक क्रांती व फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोप खंडाच्या सामाजिक जीवनपद्धतीत आमुलाग्र बदल होवून सरंजामशाही समाजव्यवस्थेचा अंत होवू लागला होता. या सामाजिक बदलामुळे व घडामोडीमुळे अनेक विचारवंतांच्या मतप्रवाहामध्ये भिन्नता दिसून येणे स्वाभाविक होते. परंपरागत समाजव्यवस्थेचा अंत व नवसमाजाचा उदय यातील भिन्नतेकडे कॉम्तचे लक्ष आकर्षित झाले होते. सरंजामशाही समाजव्यवस्थेचे त्यांनी 'आदि दैविक' किंवा 'धर्मशास्त्रीय' (Theological) आणि सैनिकी (Military) अशा पद्धतीने वर्णन केले आहे. मध्ययुगीन काळात सामाजिक एकता व स्थिरता निर्माण करण्याचे एकमेव साधन म्हणजे धार्मिक श्रद्धा हीच होती. त्यामुळे पुरोहितांचे वैचारिक व योद्ध्यांचे ऐहिक स्वरूपाचे वर्चस्व समाजावर होते. वैचारिक सत्ता धर्मगुरूंकडे व राजकीय सत्ता सैनिकांकडे केंद्रित झालेली होती. अशी परंपरागत सरंजामदारी समाजव्यवस्था औद्योगिक क्रांतीमुळे ऱ्हास पावू लागली होती.

स्वाभाविकतःच औद्योगिक क्रांतीमुळे उद्योगप्रधान समाजव्यवस्था उदयास येवू लागली व या नवसमाजास कॉम्तने 'विज्ञाननिष्ठ' समाज म्हणून संबोधले आहे. कॉम्तने वैज्ञानिक पद्धतीला विशेष महत्त्व दिलेले दिसून येते. प्रचलित तात्विक आणि धार्मिक पद्धतीद्वारा सामाजिक घटनांचे अध्ययन करणे कॉम्तला मान्य नव्हते. त्यामुळे सामाजिक अध्ययनामध्ये निरीक्षण, परीक्षण

Nanded Sub-Centre LIBRARY 15817



आणि वर्गीकरणाच्या एका व्यवस्थित वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करण्याची त्यांना आवश्यकता वाटत होती. शास्त्रीय विचारप्रणाली व बुद्धिनिष्ठता ही नवसमाजाची प्रमुख लक्षणे कॉम्तने ओळखली होती. पूर्वीच्या पुरोहितांचे व योद्ध्यांचे स्थान नवसमाजात शास्त्रज्ञ व उद्योगपतींनी घेतले यावर कॉम्तचा विश्वास होता. नवसमाजाच्या समस्या व उणिवा यांचे वर्गीकरण करण्यासाठी ऑगस्त कॉम्तने बुद्धिनिष्ठतेवर अथवा बौद्धिक सुधारणेवर विशेष भर दिला आहे. नवसमाजाची पुनर्संघटना क्रांतीच्या किंवा दहशतीच्या मार्गाने साध्य होत नसून विज्ञाननिष्ठतेच्या व पुरोगामी विचारसरणीच्या माध्यमातून साध्य होत असते असा विश्वास कॉम्तने व्यक्त केला आहे. त्यासाठी एका व्यवस्थित वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करण्याची त्यांना आवश्यकता वाटत होती.

कॉम्तचा असा विश्वास होता की, सामाजिक घटनांचे अध्ययन हे एक विशेष अध्ययनक्षेत्र आहे की ज्यामध्ये व्यक्तीच्या सामुहिक जीवनाची अभिव्यक्ती होते. अस्तंगत समाजापासून नवसमाज निर्माण करतेवेळी त्यांनी वस्तुनिष्ठ शास्त्राचा (Positive Science) पुरस्कार केलेला आहे. कॉम्तच्या मते, ज्याप्रमाणे जीवशास्त्रामध्ये संपूर्ण प्राणी आणि वनस्पती यांच्या शारीरिक रचना व कार्याचा अभ्यास होतो, त्याचप्रमाणे सामुहिक समाजजीवन आणि त्यासंबंधित मूलभूत नियमांचे अध्ययन करण्यासाठी एका वेगळ्या शास्त्राची आवश्यकता आहे. अशाप्रकारचे वस्तुनिष्ठ अध्ययन करणाऱ्या शास्त्रास कॉम्तने 'समाजशास्त्र' (Sociology) ही संज्ञा दिलेली आहे.

## तीन अवस्थांचा नियम किंवा मानवी प्रगतीचा नियम
## (Law of Three Stages or Law of Human Progress)

नवसमाजाच्या गरजा अथवा प्रगती समाजशास्त्राच्या अध्ययनामार्फत परिपूर्ण होवू शकतात यावर कॉम्तने भर दिला आहे. परंतु त्यासाठी मानवाच्या बौद्धिक विकासाची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे. मानवी बुद्धिमत्तेच्या विकासाचे मूल्यमापन मानवी मनाच्या विकासाच्या तीन अवस्थेतून त्यांनी विशद केले आहे. 'तीन अवस्थांचा नियम' किंवा 'मानवी प्रगतीचा नियम' म्हणजे कॉम्तने समाजशास्त्राला दिलेली अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व असामान्य अशी देणगी होय. सन १८२२ साली वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी कॉम्तने हा महत्त्वपूर्ण नियम प्रतिपादन केला आहे.

मानवी बुद्धिमत्तेशी निगडित असलेली कोणतीही ज्ञानशाखा विकसित होत असताना तिला प्रामुख्याने तीन वेगवेगळ्या परंतु एकानंतर एक अशा विशिष्ट क्रमाने येणाऱ्या तात्त्विक अवस्थांतून मार्गक्रमण करावे लागते, असे मत कॉम्तने प्रकट केले आहे. या तीन तात्त्विक अवस्था पुढीलप्रमाणे आहेत.

(१) धर्मशास्त्रीय अथवा असत्य अवस्था (Theological or Fictitious Stage)

(२) आध्यात्मिक अथवा अमूर्त अवस्था (Metaphysical or Abstract Stage)

(३) प्रत्यक्षवादी अथवा विज्ञानवादी अवस्था (Positive or Scientific Stage)

कॉम्तच्या मते, या तीन अवस्थांचा नियम म्हणजेच मानवी प्रगतीचा नियम होय. मानवी ज्ञानाची उकल करण्याच्या या तीन वेगवेगळ्या अवस्था आहेत. कोणत्याही घटनेचे मानवी मनाद्वारे स्पष्टीकरण करण्याचे तीन वेगवेगळे मार्ग असून प्रत्येक मार्ग हा पुढच्या यशस्वी मार्गक्रमणाची सुरुवात आहे. या तीन अवस्था विस्ताराने पुढीलप्रमाणे पाहू.

## (१) धर्मशास्त्रीय अथवा असत्य अवस्था :

**(Theological or Fictitious Stage) :**

धर्मशास्त्रीय अथवा असत्य अवस्थेत प्रत्येक सजीव प्राण्याच्या आवश्यक गरजांच्या स्वरूपाचा मानव विचार करीत असतो. त्यात या विश्वात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे पहिले आणि शेवटचे कारण अतिमानवी किंवा अतिनैसर्गिक शक्तीच असते. मानवी बुद्धिमत्तेच्या प्राथमिक अवस्थेत मानव ईश्वरीय शक्तीचा आधार घेत असतो. या अवस्थेत ईश्वराच्या इच्छेनुसारच संपूर्ण विश्वासाचा गाडा चालविला जातो यावर लोकांचा विश्वास असतो. मनुष्य हा सर्व गोष्टी परमेश्वरातच पाहतो आणि त्याच स्वरूपात त्याचे विश्लेषण करतो. उदा. जसे आदिम मानवाला नदी, नाले, पर्वत, डोंगर यात देव दिसत होता. झाडेझुडपे, नद्यांचे प्रवाह, पाऊस, वादळ, महापूर, दिवस-रात्र, उन्हाळा-हिवाळा इत्यादी घटना ह्या कोणत्यातरी अलौकिक ईश्वरीय शक्तीमुळेच निर्माण होतात अशा प्रकारची पूर्वी मानवाची समजूत होती. अर्थात पृथ्वीवरील सर्व घटना ह्या परमेश्वरप्रेरित आहेत असे गृहीत धरण्यात आले होते. परमेश्वरासंबंधीचा हा तर्कसंगत विचार जागृत झाल्यावर इतर मानवेत्तर प्राण्यांपेक्षा आपण वेगळे आहोत याची जाणीव प्रथम मानवाला आली. या प्रथम अवस्थेत मानव याच पद्धतीने आपल्या अवतीभवतीच्या विषयाबाबत विचार करीत असतो.

कॉम्तच्या मताप्रमाणे ही धर्मशास्त्रीय अथवा ईश्वरशास्त्रीय, असत्य अवस्थासुद्धा तीन उपव्यवस्थांमधून वाटचाल करते. त्या तीन उपव्यवस्था पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) सर्ववस्तू चेतनावाद (Fetichism)

(ब) अनेकेश्वरवाद (Polytheism)

(क) एकेश्वरवाद (Monotheism)

या तीन उपव्यवस्थांचा सुद्धा आपण विस्ताराने विचार करू.

**(अ) सर्ववस्तू चेतनावाद (Fetichism) :** कॉम्तच्या मते, धार्मिक अथवा ईश्वरशास्त्रीय अवस्थेचा प्रारंभ सर्ववस्तू चेतनावाद अथवा जीवितसत्तावादातून होता. कारण या अवस्थेत निसर्गातील सर्व वस्तूंना चेतना देणारी एक अलौकिक शक्ती असून या शक्तीमुळेच वस्तूंना सजीवता प्राप्त होते. या चेतनामयी शक्तीलाच पुढे जावून आत्म्याचे रूप प्राप्त झाले. सर्व सजीवांचे अस्तित्व आत्म्यावर अवलंबून आहे असे पुढे समजण्यात येवू लागले. म्हणजेच विश्वातील सर्वच वस्तूंमध्ये जीवात्मा आहे, कोणतीच वस्तू अचेतन नाही अशा प्रकारचा विश्वास लोकांमध्ये या अवस्थेत निर्माण झाला.

**(ब) अनेकेश्वरवाद (Polytheism) :** जेव्हा प्राचीन मानवाचे मन अधिकाधिक विचारी व संघटित बनत गेले तेव्हा अनेक घटनांच्या चमत्काराने तो गोंधळून गेला. जादूटोणा, भूत-प्रेतात्मे इत्यादी गोष्टींमुळे गोंधळून गेल्यावर त्याच्या मनाचा गोंधळ निर्माण करणाऱ्या अंधश्रद्धापासून जाणीवपूर्वक दूर जाण्याचा प्रयत्न केला. चेतनाशक्तीचे फोलपण मानवाच्या लक्षात येवू लागले. त्यातूनच ईश्वरीय कल्पना साकारल्या जावू लागली. देवी-देवतांवर विश्वास ठेवण्याची धार्मिक वृत्ती निर्माण होवू लागली. सजीवांच्या विविध अंगांना स्पर्श करणारा ईश्वर वेगळा आहे अशी समजूत मानव करू लागला. यातूनच सृष्टीत घडणाऱ्या प्रत्येक घटनेला कारणीभूत असणारा देव अथवा ईश्वर वेगळा म्हणून विविध देवदेवतांवर श्रद्धा बसली. जसे - अपत्य जन्माला घालणारा देव वेगळा, पाऊस पाडणारा, भरपूर उत्पन्न देणारा देव वेगळा, संकट आणणारा देव वेगळा तर संकटातून मानवाला तारणारा देव वेगळा, मारणारा देव वेगळा अशा विविध घटनांच्या अनुभूतीतून लोकांची वेगवेगळ्या देवदेवतांवर श्रद्धा बसली. अशाप्रकारे अनेकेश्वरवाद म्हणजे अनेक देवदेवतांच्या अस्तित्वाला मान्यता देणे होय. यालाच बहुदेववाद असेही म्हटले जाते.

**(क) एकेश्वरवाद (Monotheism) :** धार्मिक अवस्थेतील तिसरी उपअवस्था आहे. अनेकेश्वरवादातील अनेक देवदेवता-वादाच्या अस्तित्वामुळे मानवाच्या मनात स्वाभाविकतःच गोंधळ निर्माण झाला. मानव ईश्वरशास्त्रीय अवस्थेच्या शिखरावर पोहोचला. पुढे मानवी मनाचा जसजसा विकास होवू लागला तसतसा अनेक देवदेवतांवर विश्वास ठेवण्यापेक्षा एकाच ईश्वरीय शक्तीवर विश्वास ठेवू लागला. ईश्वराच्या विशेष गुणधर्माचे स्पष्टीकरण करण्यासाठी एकाच तत्त्वावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे असे मानू लागला. हाच एकेश्वरवाद होय. थोडक्यात असे म्हणता येईल की, एकेश्वरवाद म्हणजे निसर्गातील सर्व घटित घटनांच्या निर्मितीपाठीमागे एकच परमेश्वर अथवा देव आहे या विचारावर विश्वास ठेवणे होय. सृष्टीत परमेश्वर एकच असून सर्व गोष्टी त्यानेच निर्माण केल्या आहेत यावरील श्रद्धा म्हणजेच एकेश्वरवाद होय.

एकंदरीत धर्मशास्त्रीय अथवा असत्य अवस्थेत असे गृहीत धरण्यात आले की, विश्वात घडणाऱ्या सर्व घटनांचे मूळ परमेश्वर हाच आहे.

**(२) आध्यात्मिक अथवा अमूर्त अवस्था :**

**(Metaphysical or Abstract Stage) :**

आध्यात्मिक अथवा अमूर्त अवस्था म्हणजे कॉम्तच्या मते, मानवी विचारांच्या उत्क्रांतीची दुसरी अवस्था होय. कॉम्त या अवस्थेला पहिल्या अवस्थेचे संशोधित रूप मानतो. मानवी विचारांच्या विकासप्रक्रियेत कालांतराने या अवस्थेत अतिनैसर्गिक वस्तूंच्या ऐवजी अमूर्त शक्ती अशा घटना घडण्यास कारणीभूत असतात यावर भर दिला जातो. म्हणजेच या अवस्थेत मानवाने ईश्वरीय संकल्पनेला तिलांजली देवून त्याऐवजी अमूर्त शक्तीच्या संकल्पनेचा पाठपुरावा केला होता. या अवस्थेत मानवी बुद्धीच्या पूर्ण विकसित अवस्थेमध्ये कोणत्याही गोष्टीवर तो अंधविश्वास ठेवत नाही, तर तो अनेक प्रश्नांचे तर्कपूर्ण उत्तरे शोधतो. ईश्वरावरील शक्तीमुळे तो

अमूर्त व निराकार शक्तीवर विश्वास ठेवू लागतो. कॉम्त यावर स्पष्टीकरण देताना म्हणतो की, ईश्वरशास्त्रीय अवस्थेत मानवाने ईश्वर, परमेश्वर अथवा देव ही संकल्पना निर्माण केली होती. परमेश्वर हाच सर्व घटनांचा कर्ता-करविता आहे असे मानले जात होते. परंतु आध्यात्मिक अवस्थेत मात्र ईश्वर या संकल्पनेचा त्याग करून त्याऐवजी अमूर्त शक्तीच्या संकल्पनेला मान्यता दिली. आध्यात्मिक अवस्था ही धर्मशास्त्रीय अथवा ईश्वरशास्त्रीय अवस्था आणि प्रत्यक्षवादी अवस्था यांना साधणारा पारंपरिक दुवा आहे असे मानतो.

आध्यात्मिक अवस्थेवर चर्चा करताना **जॉन स्टुअर्ट मील** म्हणतो की, ''या अवस्थेमध्ये सृष्टीच्या विविध घटकांना उत्पन्न आणि निर्देशित करणारा असा कोणताच ईश्वर नसतो. ती एक शक्ती मानली जाते की जी सर्व वस्तूंमध्ये विद्यमान असूनदेखील त्यापासून अलिप्त आहे.'' तर **इरविंग एम. झेटलिन (Erving M. Zeitlin)** या विचारवंतांच्या मते, ''आध्यात्मिक अवस्था ही आवश्यक होती. कारण या अवस्थेतच जुनी अवस्था मोडली जावून त्याऐवजी क्रांतीच्या द्वारे नवीन तत्त्वज्ञान आत्मसात करणारी आणि प्रगतीकडे वाटचाल करणारी प्रत्यक्ष अवस्था निर्माण होण्याची वाट सुलभ झाली.'' एकंदरीत या अवस्थेत मानव ईश्वर किंवा अलौकिक शक्ती या संकल्पनेचा त्याग करून त्याऐवजी अदृश्य, अमूर्त अथवा गूढ शक्तीच्या संकल्पनेचा विचार करतो.

## (३) प्रत्यक्षवादी अथवा विज्ञानवादी अवस्था :

**(Positive or Scientific Stage) :**

मानवी बुद्धिमत्तेच्या विकास अवस्थेतील ही सर्वोच्च अवस्था म्हणून ओळखली जाते. कॉम्तच्या मते, मानवी चिंतनाची तिसरी व शेवटची अवस्था म्हणजे प्रत्यक्षवादी अथवा विज्ञानवादी अवस्था होय. आध्यात्मिक अथवा अमूर्त संकल्पना ह्या कदाचित निरंकुश असू शकतील, परंतु व्यवहाराच्या कसोटीला त्या उतरू शकत नाहीत. कारण निरीक्षण आणि कारणमीमांसा या कसोट्यांपुढे या कल्पना टिकू शकत नाही. ज्यावेळी मनुष्य निरंकुश समजुतीपासून दूर जावू लागतो, निरीक्षण आणि कारणमीमांसा या मार्गाने मार्गक्रमण करतो तेव्हा तो अंतिम अशा वैज्ञानिक वा प्रत्यक्ष अवस्थेला पोहचतो. या अवस्थेत विश्वातील अनेक घडामोडींचे विश्लेषण करतेवेळी निरीक्षण, तार्किक विचारसरणी व घडामोडीतील पारस्परिक संबंधासारख्या वैज्ञानिक अभ्यास पद्धतीचा अवलंब केला जावू लागला. ज्यावेळेस आपण तथ्यांच्या किंवा वस्तुस्थितीच्या स्पष्टीकरणाच्या संदर्भात बोलतो तेव्हा एका असाधारण घटनेचा इतर काही सर्वसामान्य तथ्यांशी संबंध प्रस्थापित करणे होय असे मानले जाते.

''तर्क आणि निरीक्षण हे वास्तविक ज्ञानाचे आधार आहेत'' असे कॉम्तचे मत आहे. जेव्हा आपण कोणत्याही घटनेची परिभाषा करतो तेव्हा काही सामान्य तथ्ये आणि घटनांमधील संबंध शोधण्याचा प्रयत्न करतो. हे विश्लेषण केवळ निरीक्षणाच्या माध्यमातूनच यथार्थ होवू शकते. निरीक्षण हेच प्रमाण असून ते वास्तविक असते, काल्पनिक नव्हे. जसे : पूर्वी कल्पनेच्या आधारावर राहू-केतू, राक्षस चंद्र-सूर्याला गिळतात अशा गोष्टी बालपणी आपण ऐकल्या

होत्या. परंतु विज्ञानाच्या प्रगतीबरोबर अशा भ्रामक कल्पना मागे पडल्या असून चंद्र-सूर्य ग्रहणाबाबतची वस्तुस्थिती विज्ञानाने आता सर्वांच्या लक्षात आणून दिली आहे. कारण तर्कमीमांसा आणि निरीक्षण यावर अधिकाधिक विसंबून राहण्याचा आग्रह धरणे व अनुभवातून वैज्ञानिक नियम तयार करणे हे वैज्ञानिक अवस्थेचे मूळ आधार आहेत. हेच स्पष्ट करताना कॉम्त म्हणतो की, ''विश्वातील विभिन्न तथ्ये आणि घटनांना लक्षात घेण्याचे वास्तविक आणि योग्य साधन निरीक्षण आणि वर्गीकरण हेच आहे. म्हणूनच प्रत्यक्षवादाच्या अथवा विज्ञानवादाच्या अवस्थेत व्यक्ती विश्वातील वेगवेगळ्या तथ्यांचा काल्पनिक अथवा आध्यात्मिक दृष्टीने विचार करीत नाही. या अवस्थेत वास्तविक ज्ञानाचा संग्रह हेच एकमेव साध्य किंवा अंतिम उद्देश असतो.'' कॉम्तने आपली प्रत्यक्षवादाची संकल्पना या आधारावरच विकसित केली आहे.

अशाप्रकारे कॉम्तने मानवी चिंतनाच्या किंवा विकासाच्या तीन अवस्थांचे विश्लेषण केलेले आहे. ज्ञानाचे वेगवेगळे प्रकार प्रगतीच्या वरील तीन अवस्थेतून गेलेल्या आहेत यावर कॉम्तने भर दिलेला आहे. प्रगतीचा काळ एकसारखा नसल्यामुळे व ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात मानवाने सारख्या बौद्धिक विकासाची पातळी गाठलेली नसल्यामुळे ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात सर्वांगीण विकासाची अवस्था प्राप्त झालेली नाही असे दिसून येते.

## विकासाच्या अवस्था आणि सामाजिक संघटन
## (Stages of Development and Social Organisation)

कॉम्तने मानवी विकासाच्या प्रत्येक अवस्थेचा एक विशिष्ट सामाजिक संघटनेशी संबंध असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रत्येक मानवी युगातील सामाजिक संघटन आणि राजकीय वर्चस्वाचा प्रकार यांचा आपल्या तीन अवस्थांचा नियम अथवा मानवी प्रगतीचा नियम यांच्याशी परस्परसंबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम अवस्थेत कुटुंब हे सामाजिक परिमाणाचे मूल रूप होते, दुसऱ्या अवस्थेत सामाजिक संघटनेत राज्याचा प्रभाव वाढू लागला तर तिसऱ्या अवस्थेत संपूर्ण मानवी वंशच सामाजिक परिमाणाचा घटक म्हणून पुढे आला. तसेच सामाजिक संघटन व राजकीय वर्चस्वाचे प्रकारही कॉम्तने विशद केले आहेत. ते पुढीलप्रमाणे -

(१) कॉम्तच्या मते, धार्मिक, ईश्वरशास्त्रीय अथवा असत्य अवस्थेत समाजावर धर्मगुरूचे वर्चस्व होते तर लष्करांचे राज्य होते.

(२) आध्यात्मिक किंवा अमूर्त अवस्था ही साधारणतः मध्ययुगाशी मिळतीजुळती आहे. ही अवस्था धर्मोपदेशक आणि वकील यांच्या अधिपत्याखाली होती.

(३) वैज्ञानिक अथवा प्रत्यक्ष अवस्था ही नुकतीच उदयाला आली आहे. ही अवस्था औद्योगिक, प्रशासक आणि वैज्ञानिक, नैतिक मार्गदर्शक यांच्या अधिपत्याखाली राहील असे नमूद केले आहे.

कॉम्तच्या वरील तीन अवस्थांच्या नियमांवर अथवा मानवी प्रगतीच्या नियमांवर थोडक्यात विवेचन करावयाचे झाल्यास **कोझर** असे म्हणतो की, ''प्रत्येक अवस्था वेगवेगळ्या मानवी युगाचा निर्देश करते व प्रत्येक युगातील मानवी प्रगतीचा आलेख काढते.'' अखेर मानवी विकासाच्या अवस्थेबद्दल कॉम्तने प्रतिपादन केलेले विचार हे अतिशय महत्त्वपूर्ण आहेत.

Size : 29.7
MRP Rs. 105.00
of all taxes

## समाजशास्त्राचे स्वरूप व व्याख्या

## (Nature & Definition of Sociology)

विश्लेषणात्मक नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच समन्वयात्मक (Synthetic) स्वरूपाच्या समाजशास्त्राला वस्तुनिष्ठ अभ्यास पद्धतीचा अवलंब करावा लागतो, यावर कॉम्तने विशेष भर दिला आहे. समाजाची कोणतीही घटना समाजापासून वेगळी करून अभ्यासता येत नाही. कारण समाज एक व्यवस्था आहे. या व्यवस्थेअंतर्गत अनेक उपव्यवस्था असतात. समाज एक अखंड व्यवस्था नसून अनेक भाग मिळून ती बनलेली आहे. हे सर्व भाग एक-दुसऱ्यावर आधारित आणि परस्परसंबंधित आहे. यावरूनच कॉम्तने सामाजिक सावयवाची (Social Organism) कल्पना मांडली. समाज हा एक सजीव सावयवी प्राणी आहे, या अभिन्न किंवा समग्र जाणिवेतून समाजातील अनेक घटनांचा समाजशास्त्रास अभ्यास करावा लागतो, असे त्यांनी मत प्रगट केले आहे. कोणत्याही विशिष्ट समाजातील व विशिष्ट कालखंडातील घडलेल्या घटनांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी त्या विशिष्ट समाजाच्या विकासाची संपूर्ण पार्श्वभूमी अभ्यासावी लागते. कॉम्तच्या मते, ''समाजशास्त्र हे संपूर्ण मानवजातीच्या विकासाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे.'' संपूर्ण मानवजातीचा इतिहास हाच या शास्त्राचा अभ्यासविषय आहे.

कॉम्तने समाजशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे - *''समाजशास्त्र हे प्रामुख्याने सामाजिक व्यवस्था आणि प्रगतीचे शास्त्र आहे आणि अधिक सामान्यरूपात हे सामाजिक घटनांचे शास्त्र आहे.''* (*"Sociology specifically is the science of social order and progress, and in a more general way as the science of social phenomena."*)

कॉम्तच्या दृष्टिकोनातून समाजशास्त्राचे स्वरूप पाहताना शास्त्राच्या वर्गीकरणाचा विचार महत्त्वाचा ठरतो. कॉम्तने शास्त्राचे (१) सैद्धांतिक (Theoretical) आणि (२) प्रात्यक्षिक (Practical) असे प्रकार पाडलेले आहेत. मानवी ज्ञानाची उत्क्रांती व प्रत्यक्षवाद यांचे मूळ शोधताना आणि 'सामाजिक भौतिकशास्त्र' किंवा 'समाजशास्त्र' या आपल्या नवीन शास्त्राचा पाया रचताना कॉम्तने 'शास्त्राचे वर्गीकरण' हा दुसरा महत्त्वाचा नियम तयार केला. कॉम्तचा हा महत्त्वपूर्ण नियम असा की, शास्त्राचा किंवा विज्ञानाचा विकास हा निश्चित मार्गानेच होत राहील. हा निश्चित मार्ग म्हणजे विकासाच्या प्रक्रियेत त्या त्या शास्त्राच्या सामान्य तत्त्वात घट होत जावून विशिष्ट तत्त्वे आणि गुंतागुंत यात वाढ होत जाते.

कॉम्तने सैद्धांतिक शास्त्राचे मूर्त किंवा वर्णनात्मक व अमूर्त असे दोन उपप्रकार पाडले आहेत. गणित, खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान इत्यादी बौद्धिक विकासाची सर्वोच्च पातळी गाठलेली असल्यामुळे त्यांचा मूर्त सैद्धांतिक शास्त्रात त्यांनी समावेश केला आहे. परंतु मानव समाजाचा अभ्यास करणारे समाजशास्त्र क्लिष्ट असल्यामुळे बौद्धिक विकासाची वस्तुनिष्ठ पातळी गाठता येणे अत्यंत कठीण आहे. परंतु शास्त्रीय अध्ययन पद्धतीचा अवलंब केल्यास समाजशास्त्रालाही बौद्धिक विकासाची वस्तुनिष्ठ पातळी गाठता येईल असा विश्वास कॉम्तने व्यक्त केला आहे.

कॉम्तने ह्या समाजशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती निश्चित करण्यासाठी या शास्त्राच्या अभ्यासाची दिशा काय असावी, समाजशास्त्राचे इतर शास्त्रांशी अथवा ज्ञानशाखांशी कसे परस्परसंबंध असावेत या संदर्भात कॉम्तने सारासार विचार मांडला. त्यातूनच कॉम्तचा शास्त्रांच्या वर्गीकरणाचा नियम उदयास आला.

कॉम्तच्या मते, समाज एक अखंड व्यवस्था नसून अनेक भाग मिळून बनली आहे. हे समाजाचे सर्व भाग एक-दुसऱ्यावर आधारित आणि परस्परसंबंधित आहेत. तसेच या सर्व भागात परस्पर सामंजस्य निर्माण होते. असे सामंजस्य निर्माण होणे हाच सामाजिक व्यवस्थेचा आधार आहे. समाजात सतत परिवर्तन होत असते. समाज ही स्थिर व्यवस्था नसून ती एक गतिशील व्यवस्था आहे. कॉम्तच्या मते, समाजशास्त्र हे सामाजिक प्रगतीचे विज्ञान आहे. त्यांनी सामाजिक प्रगतीलाच विज्ञानाचे लक्ष मानले आहे. कॉम्तच्या मते, समाजशास्त्र हे अशा भौतिक, बौद्धिक आणि नैतिक सिद्धांतांचा शोध घेते की ज्याद्वारे सामाजिक प्रगती करणे शक्य होते. कॉम्तच्या मते, समाजशास्त्र एक अमूर्त विज्ञान आहे. तसेच समाजशास्त्र हे सामाजिक जीवनाच्या कोणत्याही एका विशिष्ट घटकाचे अध्ययन करीत नाही तर समाजाचे अध्ययन समग्ररूपात करते. त्यामुळे ते समन्वयात्मक विज्ञान आहे. कारण सामाजिक जीवनाचे वेगवेगळे अंग अथवा भाग हे एक-दुसऱ्यावर निर्भर आणि परस्परसंबंधित आहेत. समाजशास्त्र या वेगवेगळ्या भागांना एकत्र करून त्यांच्या परस्परसंबंधित रूपाचे अध्ययन करते.

एकंदरीत कॉम्तचे समाजशास्त्र हे प्रत्यक्षवादी शास्त्र आहे तसेच ते अमूर्त व समन्वयात्मक शास्त्र आहे. ते शास्त्र असल्यामुळे भविष्यकथन करणारे शास्त्र आहे. समाजशास्त्रात सामाजिक तथ्यांचे निष्पक्ष अध्ययन करून सामान्य नियमांचा शोध घेतला जातो. समाजशास्त्र म्हणजे पुनर्निर्माणाचे देखील शास्त्र आहे.

## समाजशास्त्राच्या शाखाविषयक दृष्टिकोन
## (Approach of the Branch Matter of Sociology)

समाजशास्त्राचा अभ्यास करताना समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी दोन दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून त्याचे अध्ययन करावे असे कॉम्तने प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते, समाजशास्त्राचे स्थितिस्थापकत्व हे समाजाच्या अस्तित्वावर व समाजव्यवस्थेवर अवलंबिलेले असते. परिस्थितीनुसार समाजात नेहमी बदल होत असतात. समाजाची स्थिती व गती एकमेकांशी इतक्या एकरूप असतात की, त्यामुळे दोघांमधील निश्चित फरक विशद करता येणे कठीण जाते. म्हणूनच -

(१) सामाजिक स्थितिशास्त्र (Social Statics)

(२) सामाजिक गतिशास्त्र (Social Dynamics)

अशा दोन भागात कॉम्तने समाजशास्त्राला विभाजित केले असून सामाजिक स्थितिशास्त्र हे समाजाच्या संरचनेशी संबंधित आहे, तर सामाजिक गतिशास्त्र हे समाजाच्या विकासाशी संबंधित आहे. ह्या दोन्ही शाखा अभ्यासणे समाजशास्त्रीयदृष्ट्या अत्यंत उपयुक्त ठरेल.

## (१) सामाजिक स्थितिशास्त्र :

**(Social Static) :**

कॉम्तच्या मते, सामाजिक स्थितिशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे. स्थितिशास्त्रात सामाजिक व्यवस्थेच्या तत्त्वांचे विवरण केले जाते. कॉम्तच्या मते, संपूर्ण मानवसमाजाची जडणघडण ही निसर्ग नियमांना (Law of Nature) अनुसरून होत असते. कोणताही मानवसमाज आपल्या बौद्धिक समस्येच्या बळावर आपल्या समाजातील प्रश्न आणि समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे सामाजिक नियमांचे स्वरूप लवचिक बनते. परंतु कॉम्तने संघटित समाजव्यवस्थेसाठी वैचारिक ऐक्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. सामाजिक स्थितिशास्त्रात सामाजिक अवयवांचा (Social Organism) म्हणजेच समाजातील विविध भागांचा, त्यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास केला पाहिजे. शरीराचे सर्व अवयव परस्परसंबंधित व परस्परांवर निर्भर असल्यामुळे त्यांच्यात सामंजस्य निर्माण होते. हे सामंजस्य शरीराचे व्यवहार सुरळीत चालण्याच्या दृष्टीने जसे आवश्यक आहेत तसेच समाजव्यवस्थासुद्धा वेगवेगळे समाजाचे भाग मिळून बनत असते व त्यांच्यातही सामंजस्य असते. समाजव्यवस्था ही सामाजिक एकात्मतेवर व श्रमविभाजनावर अवलंबलेली असते. समाजातील उणिवांचे निराकरण करण्यासाठी क्रांती अथवा दहशतीच्या मार्गाचा अवलंब न करता समायोजनाचा मार्ग स्वीकारण्यावर कॉम्तने भर दिला आहे. समाजशास्त्राचा अभ्यास पृथक न करता समग्रपणे केला पाहिजे, सर्व भागात सामंजस्य असले पाहिजे. पण ते केवळ राजकीय संस्था, सामाजिक व्यवहार आणि विचारांचा केवळ आपसात समन्वय होणे पर्याप्त नाही तर त्याचबरोबर मानवाच्या बौद्धिक, नैतिक व भौतिक क्रियांमध्येही समन्वय असले पाहिजे यावर कॉम्तने भर दिला आहे.

समाजव्यवस्थेत व्यक्ती, कुटुंब व विशाल सामाजिक गट या तीन मूलभूत घटकांचा समावेश होत असतो. त्यातील 'व्यक्ती' हा जरी समाजाचा अविभाज्य घटक असला तरी व्यक्तीला समाजशास्त्राचा अभ्यासविषय मानणे अशास्त्रीय ठरेल. कारण व्यक्तीचे सामाजिक जीवन हे कुटुंबातूनच घडत असते. त्यामुळे व्यक्तीपेक्षा कुटुंबसंस्था हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय मानणे अधिक संयुक्तिक आहे यावर कॉम्तने अधिक भर दिला आहे.

व्यक्ती कुटुंबातच जन्माला येतो व वाढतो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास कुटुंबातच होतो. त्यामुळे कुटुंब ही समाजसंस्थेतील मूलभूत संस्था असून अनेक कुटुंबातील पारस्परिक संबंधातून समाजात वर्ग-जाती यासारखे गट निर्माण होत असतात. त्यातूनच पुढे देश आणि राष्ट्र जन्माला येते. कुटुंबाच्या भावनिक ऐक्यामुळे व नैतिक अधिष्ठानामुळे इतर सामाजिक संस्थेपेक्षा कुटुंबसंस्थेस विशेष दर्जा प्राप्त झाला आहे. एकंदरीत संपूर्ण मानवी वंश हा एका कुटुंबाच्या हळूहळू होणाऱ्या विस्तारातून निर्माण झाला असून या सर्व गोष्टींचा अभ्यास सामाजिक स्थितिशास्त्राच्या शाखेत होण्यासाठी कुटुंब संस्थेस उदात्त स्वरूप देण्याचा कॉम्तने प्रयत्न केला आहे. राज्यसंस्था ही कृत्रिम संस्था असल्यामुळे समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी शासन संस्थेची आवश्यकता कॉम्तने व्यक्त केली आहे. समाजावर कोणीतरी सत्ता गाजवावी अशी

समाजाची धारणा असते. तसेच सामाजिक विविधतेतून सामाजिक ऐक्य निर्माण करण्याच्या प्रक्रियेत भाषा, धर्म व श्रमविभाजन या तीन मूलभूत घटकांना कॉम्तने महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. सामाजिक संपर्क निर्माण करण्याचे व वाढविण्याचे जबरदस्त सामर्थ्य भाषेत समाविष्ट असते. सामाजिक ऐक्य व अखंडत्व भाषेच्या माध्यमातून प्रस्थापित होत असतात. तसेच मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवून सामाजिक मार्गदर्शकाची भूमिका धर्म वठवित असतो. सामाजिक ऐक्याच्या भूमिकेतून धर्माला भाषेइतकेच श्रेष्ठ लेखण्याचा प्रयत्न कॉम्तने केला आहे.

व्यक्तिमत्वाच्या पोषक वातावरणासाठी कॉम्तने श्रमविभाजनाचे महत्त्व विशद केले आहे. औद्योगिक क्रांतीनंतर व्यवसायाच्या विशेषीकरणाला अधिक चालना मिळू लागली. व्यक्तिवादी विचारसरणीचे स्तोम अधिक वाढू लागले. व्यक्तीचे जीवन आत्मकेंद्री बनू लागले. त्याचा अनिष्ट परिणाम समाजाच्या नैतिक जीवनावर होवू लागला. समाजातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास होवू लागल्याने विघातक प्रवृत्तींना अधिक चालना मिळू लागली. या विघातक प्रवृत्तीवर समाजातील ऐहिक व आत्मिक शक्ती नियंत्रण टाकू शकतील असा विश्वास कॉम्तने व्यक्त केला. त्यासाठी त्यांनी श्रमविभाजनाचे महत्त्व विशद केले.

सामाजिक स्थितिशास्त्राचा उद्देश हा सामाजिक अवयवातील एकमतांचा शोध आणि सामाजिक स्थिरत्वाच्या परिस्थितीचा शोध घेणे हा आहे, हे कॉम्तने स्पष्ट केले आहे. जेव्हा सामाजिक संतुलन बिघडते तेव्हा सामाजिक संतुलनाची पुनर्स्थापना करण्यासाठी आवश्यक परिस्थितीचे अध्ययन करणे हे सामाजिक स्थितिशास्त्राचे कार्य आहे. एकंदरीत समाजसंरचनेतील काही घटक कायम स्वरूपाचे म्हणजेच स्थिर असतात. काळ, परिस्थिती बदलली तरी हे घटक सर्वच समाजरचनेत अस्तित्वात असतात. अशा स्थिर व कायम स्वरूपाच्या घटकांचा अभ्यास सामाजिक स्थितिशास्त्राच्या शाखेत समाजशास्त्राने करावे असे कॉम्तचे मत आहे.

### (२) सामाजिक गतिशीलता :

**(Social Dynamics) :**

सामाजिक प्रगती व उत्क्रांती हे सामाजिक गतिशास्त्राचे अभ्यासविषय आहे. कॉम्तने सामाजिक स्थितिशास्त्रापेक्षा सामाजिक गतिशास्त्रास अधिक महत्त्व दिले आहे. मानवी जीवनात सतत बदल होत असतात. पूर्वीचे मानवी जीवन आज दिसत नाही आणि आजचे मानवी जीवन भविष्यकाळात अस्तित्वात राहणार नाही. म्हणजेच सामाजिक गतिशास्त्र हे समाजाच्या क्रमशः परिवर्तनाचे शास्त्र आहे. कॉम्तच्या मते, सामाजिक गतिशास्त्र हे मानवाच्या आवश्यक असणाऱ्या आणि सतत चालणाऱ्या चळवळींचे शास्त्र आहे. कॉम्तने सामाजिक प्रगतीच्या तत्त्वांचे विवेचन केले आहे. सामाजिक प्रगतीच्या अवस्थांची एक मालिका निर्माण झालेली असते. एका प्रगत सामाजिक अवस्थेतून अन्य प्रगत सामाजिक अवस्था क्रमशः निर्माण होत असतात असे कॉम्तचे मत आहे. अशा अखंड प्रगतीमागे कोणते नियम प्रस्थापित होवू शकतात याचे समाजशास्त्रातील सामाजिक गतिशीलता या शाखेने वस्तुनिष्ठ अध्ययन करावे. सामाजिक गतिशास्त्र हे अनुवर्तनेचे (Succession) नियम अभ्यासत असते.

कॉम्तच्या मते, सामाजिक प्रगतीच्या अवस्थांचा क्रम हा सुगम व पद्धतशीर असतो. सामाजिक घडामोडी ह्या नैसर्गिक व वस्तुनिष्ठ नियमानुसार घडत असतात. अपवादाने हा क्रम निरपेक्ष नसला तरी काही समानतेचा आणि आवश्यक अनुक्रमांचा शोध यामुळे घेता येतो.

भौगोलिक परिस्थिती, हवामान, वंश, राजकीय घडामोडी, मानवी आयुष्यमान, लोकसंख्येत होणारी वाढ, उत्क्रांतीच्या अवस्थांचा क्रम, उत्क्रांतीच्या दिशा व प्रगतीचा वेग इत्यादी सामाजिक परिवर्तनाचे परिणामकारक घटक असल्याचे कॉम्तने विशद केले आहे. मानवी जीवनाप्रमाणेच मानवी संस्कृतीसुद्धा सतत बदलत असते. या बदलत्या मानवी सांस्कृतिक परिस्थितीचाही अभ्यास सामाजिक गतिशास्त्राने केला पाहिजे. कॉम्तच्या मते, प्रत्येक समाजाची संस्कृती त्या समाजाच्या उत्कट अशा समाजरचनेकडे वाटचाल होण्याच्या दृष्टीने विकसित करण्याचा प्रयत्न करते यात शंका नाही. हा विकास निःस्वार्थ भावनेवर आधारलेला असतो व ही निःस्वार्थ भावनाच मानवी मैत्रीचा व मंडळाचा आधार आहे. समाजसुधारणेचा कार्यक्रम समाजाची शक्ती निर्धारित करणाऱ्या नियमांच्या अनुषंगानेच होत असते, यावर कॉम्तने भर दिला आहे. समाजाच्या प्रगतीचे नियम समाजव्यवस्थेच्या स्वरूपावर व मानवाच्या बौद्धिक विकासाच्या स्वरूपावर अवलंबून असतो, असे कॉम्तचे मत आहे.

कॉम्तचे सुधारणावादी समाजशास्त्रीय विचार हे शास्त्रीय तत्त्वांवर आधारित असल्याचे दिसून येते. औद्योगिक क्रांतीमुळे सरंजामशाही समाजव्यवस्थेचा ऱ्हास होवू लागला. त्याऐवजी उद्योगप्रधान समाजव्यवस्था उदयास येवू लागली. या उदयोन्मुख नवसमाजाच्या आशावादी विचारवंतांनी या नवसमाजव्यवस्थेचे स्वागत केले. परंतु सरंजामशाही समाजव्यवस्थेतील चांगल्या संकल्पनांना मूठमाती दिल्या जावू लागली. यास्तव काही विचारवंतांनी या नवसमाजाबद्दल असमाधानही व्यक्त केले. अशा परिस्थितीत कॉम्तने गतकालीन समाजव्यवस्थेतील सामाजिक मूल्यांचे पुनरुज्जीवन कसे करता येईल, याकडेही लक्ष दिले. आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी गतकालीन समाजव्यवस्थेतील चांगल्या गोष्टी स्वीकारण्याचा सल्ला कॉम्तने दिला.

कॉम्तच्या मते, मानवाने निसर्गाविषयी शास्त्रशुद्ध विचार करण्यास जसा प्रारंभ केला तसा मानवाने स्वतःच्या समाजाबद्दल शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करण्यास प्रारंभ केला नाही. त्यामुळे आधुनिक समाजव्यवस्थेत विविध कमतरता जाणवू लागल्या. वर्तमानकालीन बुद्धिनिष्ठ विचारप्रणालीमुळे मानवास समाजाचे वस्तुनिष्ठ अध्ययन करण्याची वैचारिक पातळी हळूहळू लाभत आहे. या जाणिवेतूनच समाजाचे वस्तुनिष्ठ शास्त्र म्हणून 'समाजशास्त्र' अस्तित्वात आले असून या बदलत्या व्यवस्थेचे अध्ययन सामाजिक गतिशास्त्रात अभिप्रेत आहे, असे कॉम्तचे मत आहे. वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर भविष्यकाळाचा विचार हा सामाजिक गतिशास्त्राचा प्रमुख अभ्यासविषय आहे, ज्याद्वारे परिवर्तनातील सातत्य स्पष्ट होईल आणि संयुक्त रूपात मानवी विकासाची दिशा निर्धारित करता येईल, अशा नियमांचा शोध घेणे हा सामाजिक गतिशास्त्राचा उद्देश आहे असे कॉम्त मानतो.

अनिर्बंध उद्योग व मुक्त स्पर्धा हे नवीन औद्योगिक समाजातील सामाजिक विकृतीची लक्षणे आहेत असे मत कॉम्तने व्यक्त केले आहे. मालक व मजूर या वर्गातील वैमनस्याचे संबंध, क्रांतिकारक विचारसरणी व वर्गविहिन समाजव्यवस्था या समाजवादी विचारसरणीला कॉम्तने पूर्णतः मान्यता दिलेली नाही. औद्योगिक स्वातंत्र्यानंतर कोणत्याही प्रकारची बंधने असू नयेत, हा विचार कॉम्तला मान्य नाही. भांडवलदारांनी संपत्तीचे केंद्रीकरण करण्याऐवजी समाजाचे विश्वस्त या नात्याने संपत्तीचा उपयोग करून समाजाच्या समृद्धीत भर टाकावी अशी इच्छा कॉम्तने व्यक्त केली आहे.

एकंदरीत कॉम्तच्या मते, सामाजिक स्थितिशास्त्र हे प्रामुख्याने समाजाच्या रचनेच्या अध्ययनाच्या संबंधित आहे तर सामाजिक गतिशास्त्र हे प्रामुख्याने सामाजिक विकासाचे अध्ययन व विचार करणारे शास्त्र आहे.

## कॉम्तचा प्रत्यक्षवाद किंवा वैज्ञानिक पद्धती
## (Compte's Positivism or Scientific Method)

कॉम्तने सामाजिक घटनांच्या अध्ययनासाठी वैज्ञानिक पद्धतीला विशेष महत्त्व दिले आहे. प्रत्यक्षवादाच्या संघटन आणि समन्वयाच्या दृष्टीने कॉम्तचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सर्व प्रकारच्या आध्यात्मिक कल्पना वगळून आणि आपल्या प्रत्यक्षानुसारी विज्ञानविषयक मर्यादा स्पष्ट करणाऱ्या नवीन तत्त्वज्ञानाला कॉम्तने 'प्रत्यक्षवाद' (Positivism) ही संज्ञा दिली आहे. म्हणूनच कॉम्तला 'प्रत्यक्षवादाचा जनक' मानले जाते. कॉम्तपूर्वी ह्युम (Hume), कान्त (Kant) आणि गाल (Gall) यासारख्या विचारवंतांनी प्रत्यक्षवादासंदर्भात आपले विचार मांडले आहेत. **प्रा. आर.एन. मुखर्जी** यांच्या मते, ''प्रत्यक्षवाद अनेक प्रकारचे आहेत. परंतु प्रत्यक्षवादावर विवेचन करण्याचा पहिला प्रयत्न कॉम्तने केला असल्यामुळे कॉम्तला प्रत्यक्षवादाचा जनक म्हणून संबोधण्यात येते.''

**प्रत्यक्षवादाचा अर्थ :**
**(Meaning of Positivism) :**

'प्रत्यक्षवाद' या संज्ञेचा कॉम्तने लावलेला एक अर्थ 'विज्ञानवाद' असा आहे. 'वैज्ञानिक' या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणजेच 'प्रत्यक्षवाद' होय. मानव समाजात देश, काळ, परिस्थितीनुसार विविध प्रकारची भिन्नता निर्माण होत असते. अशा भिन्नतेस जरी शेवट नसला तरी एका विशिष्ट क्रमवार पद्धतीने ही भिन्नता निर्माण होत असते, असे कॉम्तचे मत होते. त्यांचा असा विश्वास होता की, कोणत्याही असाधारण घटना घडण्यामागे एकसारख्या नैसर्गिक नियमांचे नियंत्रण असते. या नियमांचा अर्थ आपणास समजून घ्यायचा असेल तर त्यासाठी आपणाला ईश्वरशास्त्रीय (Theological) आणि आध्यात्मिक (Metaphysical) कल्पना केवळ बाजूला सारून चालणार नाही तर वैज्ञानिक पद्धतीला घट्ट पकडून राहणे आवश्यक आहे. अशा चमत्कारिक घटनांचे वास्तव जाणून घेण्याचा व सर्व ज्ञानाचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून विश्लेषण करण्याचा मार्ग म्हणजेच 'प्रत्यक्षवाद' होय.

सामाजिक घडामोडींचा अभ्यास करणारे समाजशास्त्र हे अमूर्त सैद्धांतिक शास्त्र आहे. समाजशास्त्राच्या सामाजिक घटनांबाबत निश्चित नियम शोधून काढण्यावर कॉम्तने भर दिला आहे. ज्याप्रमाणे नैसर्गिक घटना काही निश्चित नियमांच्या आधारावर घडतात, त्याचप्रकारे निसर्गाच्या एका अंगाच्या रूपात सामाजिक घटनासुद्धा काही निश्चित नियमांच्या आधारावर घडतात. हे नियम कोणते ? सामाजिक घटना कशाप्रकारे घडून येतात ? किंवा त्यांचा क्रम व गती कोणती असते ? याचे यथार्थपणे अध्ययन करणे शक्य आहे व हाच कॉम्तच्या प्रत्यक्षवादाचा आधारभूत सिद्धांत आहे.

प्रत्यक्षवाद हा अध्यात्मविरोधी, वस्तुस्थितीनिदर्शक आणि अनुमानिक स्वरूपाचा असतो आणि सामाजिक असाधारण घटनांचे विश्लेषण, निरीक्षण, प्रयोग, वर्गीकरण ह्या वैज्ञानिक अध्ययनप्रणालीच्या आधारावर केले जाते. त्यामुळे सामाजिक घटनांच्या विश्लेषणात निरीक्षण आणि वर्गीकरण यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्यक्षवादात निरपेक्ष अथवा निरंकुश कल्पनांचा शोध घेण्याच्या प्रयत्नाचा त्याग करून त्याऐवजी सामाजिक घटनांच्या पाठीमागे न बदलणाऱ्या भौतिक नियमांचे पाठबळ असते, या विचारांचे स्पष्टीकरण केले जाते. अशाप्रकारे निरीक्षण, परीक्षण व वर्गीकरण करण्याची शास्त्रीय पद्धत म्हणजेच कॉम्तचा प्रत्यक्षवाद होय.

कॉम्त पुढे जावून म्हणतो की, कोणत्याही ज्ञानशाखेच्या उत्क्रांतीचे अंतिम ध्येय प्रत्यक्षवाद हे आहे. प्रत्यक्षवादाकडे वाटचाल करताना प्रत्येक ज्ञानशाखेला तीन टप्पे अथवा अवस्थांतून जावे लागते. त्यातील पहिला टप्पा ईश्वरशास्त्रीय अथवा असत्य अवस्थेचा आहे. यात नैसर्गिक, चमत्कृतिजन्य अथवा असाधारण घटनांचे वर्गीकरण करून त्यांनाच ईश्वर अथवा परमेश्वर समजण्यात येत असे. अर्थात या अवस्थेत निसर्गात ईश्वराची अनेक रूपे मानवाने कल्पिलेली होती. दुसरा टप्पा हा आध्यात्मिक अवस्थेचा असून यात कोणत्याही नैसर्गिक नियमांच्या पाठीमागे एखादा अमूर्त अथवा अवैयक्तिक शक्तीचा हात आहे, अशी कल्पना करण्यात आली होती, तर तिसरा आणि शेवटचा टप्पा म्हणजे प्रत्यक्षवादाची अवस्था होय. ज्यावेळेस वैज्ञानिक एखाद्या असाधारण घटनेतील आध्यात्मिक कल्पना वगळून केवळ घटना जशी घडली तसे त्याचे वास्तविक वर्णन करतो. म्हणजेच निरीक्षण, परीक्षण व वर्गीकरण करून त्या घटनांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला जातो.

कॉम्तचा एक इंग्रज शिष्य डॉ. ब्रिज (Dr. Bridges) यांनी प्रत्यक्षवादाचे स्पष्टीकरण देण्यासाठी सांगितलेले उदाहरण नमुनेदार असून त्याद्वारे कॉम्तचा प्रत्यक्षवाद अधिक चांगल्याप्रकारे आपल्याला समजून घेता येईल.

'झोप' ही नैसर्गिक बाब असली तरी, अफूच्या सेवनामुळे येणारी 'झोप' या असाधारण घटनेचे विश्लेषण विविध अवस्थांतील व्यक्ती जसे - धर्मवादी, तत्त्ववेत्ते आणि शास्त्रज्ञ अथवा प्रत्यक्षवादी हे वेगवेगळ्या पद्धतीने करतात, ते पाहू.

(१) ईश्वरवादी अथवा धर्मवादी लोक अफूच्या सेवनामुळे येणाऱ्या झोपेचे स्पष्टीकरण करताना सांगतात की, परमेश्वरी इच्छेमुळेच अशी झोप येते. देवाचीच तशी इच्छा असते.

(२) तत्त्ववेत्ते याबाबत असे म्हणतात की, अफूच्या सेवनानंतर झोप येणे ही स्वाभाविक बाब आहे. अफूमध्ये गुंगी आणणारे जे गुणधर्म आहेत की ज्यामुळे जागे राहणे शक्य नाही, त्यामुळेच अशा व्यक्तींना झोप येते.

(३) शास्त्रीय पद्धतीने अथवा प्रत्यक्षवादी व्यक्ती केवळ अंदाजावर आपले विधान करणार नाही तर अफूचे सेवन करून आलेली 'झोप' या असाधारण घटनेचे तो निरीक्षण करील, पृथक्करण करील, त्याचा नित्यक्रम विचारात घेवून सामान्य अवस्थेत आलेली झोप व अफूच्या सेवनानंतर आलेली झोप या संदर्भात प्रयोग करील. तसेच अफूसारख्या मादक द्रव्याचा मानवी शरीरावर कसा परिणाम होतो याचे तुलनात्मक अध्ययन निरीक्षणाच्या सहाय्याने करील व त्यानंतरच त्यावर आपले विधान करील. ही पद्धती म्हणजेच प्रत्यक्षवादी पद्धती होय.

डॉ. ब्रिज यांनी दिलेल्या वरील स्पष्टीकरणावरून हे स्पष्ट होते की, कोणत्याही घटनेच्या कारणांचे निश्चयीकरण करण्याचे आपण हेतुपुरस्सर टाळले पाहिजे. समाजातील कोणत्याही असाधारण घटित घटनांच्या कारणांचे निश्चयीकरण करणे म्हणजे केवळ तर्क अथवा अंदाज वर्तविणे होय, हे प्रत्यक्षवादात कॉम्तला अजिबात मान्य नाही. सामाजिक घटना फार क्लिष्ट असल्यामुळे पंचज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून त्यांचे निरीक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक घटनांचे अध्ययन करण्यासाठी विविध साधनांचा वापर करण्यावर कॉम्तने भर दिला आहे. पंचेंद्रियांच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या ज्ञानाला कॉम्तने 'अनुभवाधिष्ठित ज्ञान' (Empirical Knowledge) असे संबोधले आहे. घटना घडत असताना त्या घटनांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून त्याचे लगेच परीक्षण केल्यास वस्तुनिष्ठ माहिती आपणास मिळू शकते, यावर कॉम्तचा विश्वास होता. अशा निरीक्षण व वर्गीकरणामुळे घटनांतील साम्य व भेद आपल्या लक्षात येते. त्यातूनच त्या घटनेच्या कार्यकारणसंबंधाचे नियम तयार करता येतात. त्यामुळेच निरीक्षण आणि वर्गीकरण हे दोन घटक 'प्रत्यक्षवादी' पद्धतीशास्त्रातील अतिशय महत्त्वाचे घटक मानले जातात.

कॉम्तच्या प्रत्यक्षवादावर चर्चा करताना **चेम्बलिस** (Chembliss) म्हणतो की, "प्रत्यक्षवाद ही एक अशी बुद्धिवादावर आधारलेली अभ्यास पद्धती आहे की, जी प्रत्यक्षवादाचा अभ्यास करणाऱ्या सर्वांना एकत्र बांधते." कॉम्तच्या मते, प्रत्यक्षवाद हा ज्याप्रमाणे अनिश्वरवादी (Atheistic) निगडित नाही तसेच त्याचा संबंध अलौकिक शक्तीशीही नाही.

**प्रत्यक्षवादाचा संबंध** कशाशी आहे हे कॉम्त पुढीलप्रमाणे विशद करतो.

(१) प्रत्यक्षवाद हा काल्पनिकतेपेक्षा वास्तविकतेशी निगडित आहे.

(२) कॉम्तचा प्रत्यक्षवाद हा सर्व ज्ञानापेक्षा उपयुक्त ज्ञानाशी संबंधित आहे.

(३) प्रत्यक्षवाद हा अशा तथ्यांशी निगडित आहे की जी निश्चित स्वरूपाची असून त्यामुळे काही प्रमाणात दूरदृष्टी प्राप्त होवू शकते.

(४) प्रत्यक्षवाद हा अस्पष्ट अथवा संदिग्ध मतांशी निगडित नसून निश्चित किंवा असंदिग्ध ज्ञानाशी निगडित आहे.

(५) प्रत्यक्षवाद हा शाश्वत सत्याशी संबंधित नसून सतत परिवर्तनशील अशा सेंद्रिय सत्याशी संबंधित आहे.

(६) प्रत्यक्षवाद हा परिपूर्णतेपेक्षा सापेक्षतेशी निगडित आहे.

**कॉम्तच्या प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञानाचे ध्येय :**

**(Aim of Compte's Positive Philosophy) :**

कॉम्तच्या प्रत्यक्षवादी सिद्धांताचे ध्येय विशद करताना एक वैज्ञानिक पद्धती आणि बुद्धिमत्ता या संदर्भातच करणे संयुक्तिक ठरेल. कॉम्तच्या मते, ''प्रत्यक्षवाद हे असे वैज्ञानिक मत आहे की, ज्याचा उद्देश हा संपूर्ण मानव समाजाचे विशेषतः युरोपातील समाज व राष्ट्राचे भौतिक, बौद्धिक व नैतिक कल्याण साधणे हा आहे. या उद्देशाची प्राप्ती ही विशेष प्रकारची निर्देश आणि शिक्षणाद्वारे होवू शकते. एकूण मानवी समाजाचा व्यवस्थित अर्थ लावून त्याचा व्यवहारात कसा उपयोग करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे, असे कॉम्तला वाटत होते. या दृष्टीने विचार केल्यास कॉम्तची प्रत्यक्षवादी तत्त्वप्रणाली तीन महत्त्वाच्या ध्येयांकडे निर्देश करते, ते पुढीलप्रमाणे -

**(१) ज्ञानाची पूर्वतयारी करणे (Preliminaries of Knowledge) :**

कोणत्याही ज्ञानशाखेचे अध्ययन करण्यासाठी त्या ज्ञानशाखेच्या पूर्वज्ञानाची आवश्यकता असते. त्याशिवाय वस्तुनिष्ठ ज्ञानप्राप्ती होणार नाही. जसे - कोणत्याही भाषेचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी त्या भाषेची मुळाक्षरे अभ्यासणे आवश्यक असते. आकड्यांच्या ज्ञानाशिवाय गणिताची प्रमेय अभ्यासता येणार नाहीत. तसेच कोणत्याही सामाजिक घटनेचे अध्ययन करताना त्या घटनेशी संबंधित ज्ञानाची पूर्वतयारी करणे आवश्यक आहे, असे कॉम्तचे मत आहे. या ज्ञानाच्या पूर्वतयारीसाठी (अ) तर्कशास्त्र (Logic), (ब) ज्ञानमीमांसाशास्त्र (Epistemology) आणि (क) पद्धतिशास्त्र (Methodology) असे तीन घटक सांगितले आहेत. हे तिन्ही घटक म्हणजे मानवी ज्ञानाच्या पूर्वतयारीची साधने म्हणून अत्यंत महत्त्वाची आहेत. त्याशिवाय कोणत्याही ज्ञानाच्या अध्ययनाला पूर्णत्व येत नाही.

**(२) सर्व ज्ञानाचा सारांश काढणे (Synopsis of All Knowledge) :**

जागतिक विचारांची पद्धतशीर मांडणी करण्याचे कार्य प्राणिमात्र विचारशास्त्र (Ontology) करीत असते. कॉम्तच्या मते, सर्व ज्ञानाचा सारांश काढणे म्हणजे फक्त शास्त्रांचे वर्गीकरण करणे नसून जागतिक विचारांची पद्धतशीर मांडणी करणे होय. यालाच प्राणिमात्र विचारशास्त्र असे म्हणतात. प्राचीन दृष्टिकोनातून प्राणिमात्र विचारशास्त्र म्हणजे अमूर्त विचारांचा पद्धतशीरपणे अर्थ लावण्याचा केलेला पद्धतशीर प्रयत्न होय. परंतु आधुनिक दृष्टिकोनातून कोणत्याही ज्ञानशाखेचा सुसंगत आणि तथ्यांच्या अनुभवावर आधारित पद्धतशीर अभ्यासाची व्यवस्था होय. त्याचप्रमाणे विश्वोत्पत्तिशास्त्र (Cosmonomy) म्हणजे जगाच्या रचनेसंबंधीचे शास्त्र होय. हे शास्त्र आपल्यातील साम्याचा फैलाव करते आणि त्या आधारावर

सामान्य नियम तयार करते. या नियमांनाच आपण नैसर्गिक नियम म्हणतो. या शास्त्रांच्या ज्ञानाच्या आधारे या सृष्टीत मानवाचे स्थान कोणते ? मानवाचा दैवाशी काय संबंध आहे ? याचे निश्चितीकरण करता येते. अर्थात सारांशरूपी अध्ययन करता येते.

**(३) नीतिशास्त्र (Ethics) :**

कॉम्तने प्रत्यक्षीकरणाच्या क्रियेलाच 'नीतिशास्त्र' हे नाव दिले आहे. मानवाने इतर मानवाशी संबंध प्रस्थापित करताना कोणत्या मर्यादा व नियम पाळावेत हे नीतिशास्त्र सांगते. कॉम्त म्हणतो की, प्रेम हाच त्याचा सिद्धांत आहे, सुव्यवस्था हा आधार आहे आणि प्रगती हे ध्येय आहे. दुसऱ्यांसाठी जिवंत रहा हाच नैतिक नियम होय. समाजात योग्य-अयोग्यतेचे शिक्षण नीतिशास्त्र देते. नीतिशास्त्र मानवात चातुर्य व शहाणपणाची निर्मिती करते.

अशाप्रकारे जगातील सर्व ज्ञानाला पूर्वतयारी करण्याची संधी देणे, जगातील विविध घटनांचे पद्धतशीरपणे विश्लेषण करून त्याला नैतिक आधार प्राप्त करून देणे हेच कॉम्तच्या प्रत्यक्षवादाचे ध्येय होय.

**कॉम्तच्या प्रत्यक्षवादावरील आक्षेप अथवा टीका :**

**(Criticism on Compte's Positivism) :**

कॉम्तच्या प्रत्यक्षवादावर अनेक विचारवंतांनी आक्षेप घेतले आहेत. कॉम्तने सुरुवातीला विज्ञानवादाला शुद्ध वैज्ञानिक संकल्पनेने प्रारंभ केला. परंतु नंतर धार्मिक व नैतिक सिद्धांताचासुद्धा त्यात समावेश केला. त्यामुळे कॉम्त धर्म आणि विज्ञानवाद एक-दुसऱ्यापासून वेगळे मानीत नाही असे निदर्शनास येते. कॉम्तचा प्रत्यक्षवाद हा एका बाजूला विज्ञान आहे तर दुसऱ्या बाजूला धर्म आहे, अशी टीका कॉम्तच्या प्रत्यक्षवादावर केली जाते.

**युजेन ड्युहरिंग** (Eugen Duhring) हा जर्मन विचारवंत कॉम्तच्या प्रत्यक्षवादावर टीका करताना म्हणतो की, "कॉम्तच्या प्रत्यक्षवादात नमूद केलेले विचार विक्षिप्तपणाचे वाटतात. कॉम्त हे प्रत्यक्षवादी नसून अप्रत्यक्षवादी (Negativism) आहेत. प्रत्यक्षवादासाठी शास्त्राच्या वर्गीकरणाची कॉम्तने केलेली मांडणी ही तत्त्वज्ञान म्हणून मान्य करता येत नाही."

**जॉर्ज हेन्री लेव्हिस** (George Henry Lewes) यांच्या मते, "आपले कर्तव्य प्राप्त नैसर्गिक नियमांचा अभ्यास करणे, त्यातील प्रक्रियांचा शोध घेणे व या विश्वातील दैवी महत्त्व काय आहे हे पाहणे असे आहे. परंतु विश्वाच्या भव्यतेमुळे ते शक्य होत नसल्याने या अलौकिक गोष्टींच्या संदर्भात आपण अज्ञानी राहिलेलेच बरे" असा आक्षेप घेतला आहे.

वरीलप्रकारे कॉम्तच्या प्रत्यक्षवादी सिद्धांतावर अनेक आक्षेप घेतल्या गेले असले व सिद्धांतात काही त्रुटी जरी असल्या तरी, मानवी ज्ञानाच्या विश्लेषणाचे कार्य सर्वप्रथमतः कॉम्तच्या प्रत्यक्षवादी सिद्धांतानेच केले आहे, हे कोणालाही नाकारता येणार नाही. सर्व सामाजिक शास्त्रे ही एकाच वृक्षाच्या विविध शाखा असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न कॉम्तने विविध शास्त्रांच्या विकासाच्या संदर्भात केल्याचे मोठे योगदान आपणास दिसून येते.

**कॉम्तच्या समाजशास्त्रीय विचारांचे मूल्यांकन :**

**(Evaluation of Comte's Sociological Thoughts) :**

कॉम्तच्या समाजशास्त्रीय विचारावर विशेषतः त्यांच्या प्रत्यक्षवादी सिद्धांतावर खूप टीका करण्यात आली. टीकाकारांच्या मते, कॉम्तची विचारपद्धती व योजना ही वास्तविकतेपासून बरीच दूर होती. परंतु कॉम्त ज्या काळात जगला, ज्या परिस्थितीत त्यांनी आपले विचार मांडले, त्या सामाजिक परिस्थितीचा प्रभाव त्यांच्या विचारावर पडणे स्वाभाविक आहे. परंतु त्यांच्या समाजशास्त्रीय विचारांचे योगदान पुढीलप्रमाणे सांगता येईल.

(१) ऑगस्त कॉम्त हा एक फ्रेंच तत्त्ववेत्ता होय. समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करणारा व 'समाजशास्त्राचा जनक' या नात्याने कॉम्तला संबोधले जाते. समाजशास्त्र हे प्रामुख्याने सामाजिक व्यवस्था व प्रगतीचे विज्ञान आहे, अशी व्याख्या केली आहे. सामाजिक घटनांच्या अध्ययनात क्रमबद्ध निरीक्षण, परीक्षण आणि वर्गीकरणास विशेष महत्त्व असते, हे सांगून त्यांच्या अध्ययनासाठी एका वेगळ्या समाजविज्ञानाची आवश्यकता सांगून त्या शास्त्राला 'समाजशास्त्र' हे नाव दिले आहे.

(२) समाजशास्त्राच्या अध्ययनावर तीन मूलभूत नियमांद्वारे पद्धतिशास्त्राचा जो ठसा उमटविला तो महत्त्वाचा आहे. ते नियम म्हणजे (अ) सामाजिक तथ्ये हे भौतिक असाधारण घटनांसारखेच आहेत हे मान्य करणे. (ब) सामाजिक तथ्यांच्या अंतिम पृथक्करणात सामाजिक श्रद्धांचे महत्त्व कमी करणे व (क) प्रयोगपद्धतीचा उपयोग करून सामाजिक घटनांचे विश्लेषण करणे या नियमांच्या आधारे समाजशास्त्राच्या अध्ययनाला स्थिर बैठक दिली आहे.

(३) सामाजिक घटनांचे अध्ययन करणारे समाजशास्त्र हे अमूर्त सैद्धांतिक शास्त्र असल्यामुळे या समाजविज्ञानास कॉम्तने सामाजिक पदार्थविज्ञान (Social Physics) असे संबोधले आहे. समाजशास्त्र हे समन्वयात्मक (Synthetic) स्वरूपाचे शास्त्र असल्यामुळे समाजातील एखादा घटक समाजापासून वेगळा करून अध्ययन करण्याऐवजी समाजाची समग्रता (Totality) लक्षात घेवून अध्ययन करण्यावर त्यांनी भर दिला आहे.

(४) अस्तगत समाजव्यवस्थेपासून नवसमाजाची निर्मिती होईपर्यंत कॉम्तने वस्तुनिष्ठ अध्ययन पद्धतीचा (Positive Method) पुरस्कार केला आहे. वस्तुनिष्ठ अध्ययनासाठी त्यांनी बौद्धिक विकासावर भर दिला आहे. मानवी बुद्धिमत्तेचा विकास धर्मशास्त्रीय अथवा ईश्वरशास्त्रीय, आध्यात्मिक अथवा तत्त्वशास्त्रीय आणि प्रत्यक्षवादी अथवा विज्ञाननिष्ठ अशा तीन अवस्थांतून होते, असे मत त्यांनी मांडले आहे.

(५) समाजाचे अध्ययन करण्यासाठी कॉम्तने समाजशास्त्राचे सामाजिक स्थितिशास्त्र (Social Static) आणि सामाजिक गतिशास्त्र (Social Dynamics) असे दोन भागात वर्गीकरण केले आहे. सामाजिक स्थितिशास्त्रात समाजव्यवस्थेचा (Social Order) व सामाजिक गतिशास्त्रात सामाजिक प्रगतीचा (Social Progress) चा अंतर्भाव होतो. कुटुंबसंस्था ही

समाजरचनेतील मूलभूत घटकसंस्था असून राज्यसंस्था ही कुटुंबाच्या समुच्चयाचे सर्वोच्च स्वरूप आहे. समाजाच्या विभिन्न घटकांना एकत्रित ठेवण्यासाठी कॉम्तने भाषा, धर्म आणि श्रमविभाजन यांचे महत्त्व विशद केले आहे.

(६) सामाजिक प्रगतीसाठी मानवाने बुद्धी, मन व हृदय यात परस्परसंबंध साधण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. मानवी वर्तनाचे नियमन करणे व मार्गदर्शन करणे हे जसे बुद्धीचे कार्य आहे तसेच मानवी वर्तनाला चालना देणारी शक्ती भावनेला व संवेगाला महत्त्व प्राप्त झालेले असते. परंतु सामाजिक घटनांचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करण्याचे सामर्थ्य उत्क्रांतीद्वारे मानवाच्या बौद्धिक विकासामुळे साध्य झालेले आहे, यावर कॉम्तने भर दिलेला आहे.

(७) सामाजिक व्यवहारास चालना देण्यासाठी बळाची (Force) आवश्यकता असते. याशिवाय भावनांचे नियमन करून मानवास समाजाभिमुखतेची वृत्ती स्वीकारणे अत्यंत आवश्यक असते. समाजातील ऐहिक शक्तीवर आध्यात्मिक शक्तीचे नियंत्रण असले पाहिजे. परंतु ही शक्ती बुद्धी, भावना, प्रेम यातून निर्माण झाली पाहिजे, असे कॉम्तचे मत आहे.

(८) ऑगस्त कॉम्त हे समाजशास्त्राचे जनक तर आहेतच, परंतु त्याचबरोबर त्यांनी समाजसुधारकाची भूमिकाही वठविलेली आहे. त्यामुळे सामाजिक सुधारणांना कॉम्तने शास्त्रीय महत्त्व प्राप्त करून दिले आहे.

(९) पारंपरिक देवधर्मावर कॉम्तचा विश्वास नसला तरी नवसमाजनिर्मितीसाठी नवधर्माची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली आहे. अंधश्रद्धांना कोणतेही स्थान प्राप्त करून न देता वर्तमानकाळापर्यंत मानवाने ज्या ऐक्याची व स्नेहाची निर्मिती करण्याचा जो प्रयत्न केला, तीच एकात्मता नवसमाजात टिकविली पाहिजे यावर कॉम्तने भर दिला आहे. मानवतेची पूजा करणे हाच नवसमाजाचा मूलभूत धर्म आहे, याचा पुरस्कार कॉम्तने केला असल्यामुळे त्यांचा दृष्टिकोन मानवतावादी आहे असे दिसून येते.

(१०) कॉम्तने व्यक्तिवादी विचारसरणीला तीव्र विरोध करून समाजप्रधान समाजव्यवस्थेस त्यांनी अग्रक्रम दिला आहे. गतकालीन समाजव्यवस्थेतील चांगली मूल्ये नवसमाजात कशी टिकतील व सामाजिक मूल्यांचे पुनरुज्जीवन कसे साध्य करता येईल याचे कॉम्तने विवेचन केले आहे. सामाजिक सुधारणेचे कार्यक्रम समाजपरिवर्तन निर्धारित करणाऱ्या नियमांशी सुसंगत असावे असे त्यांना वाटत होते.

(११) वर्तमान नवसमाजाचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करण्याच्या अभावामुळे विद्यमान समाजात दोष निर्माण होतात असा त्यांचा दावा आहे. अनिर्बंध उद्योगाचे स्वरूप व मुक्त स्पर्धा ही औद्योगिक समाजातील सामाजिक विकृती आहे. श्रीमंत लोक हे समाजाचे विश्वस्त असून संपत्तीचा समाजाच्या समृद्धतेसाठी योग्य वापर करावा असे त्यांनी सुचविले आहे.

एकंदरीत कॉम्तने सर्व सामाजिक शास्त्रातील व विशेषतः समाजशास्त्रातील सर्व तथ्ये अथवा असाधारण घटना यांचा प्रायोगिक आणि निरीक्षण पद्धतीच्या वापराद्वारेच अध्ययन

A quality p
Exercise Book
240 Pages (Total Pages Include Index & Printed Information)
29.7 x 21 cm
Enduring Value

करण्याची नवीन प्रत्यक्षवादी पद्धती सामाजिक क्षेत्रात निर्माण केली हे समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. यावरून समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करणारा व समाजसुधारणेच्या कार्यक्रमावर विशेष भर देणारा पहिला फ्रेंच समाजशास्त्रज्ञ म्हणून ऑगस्त कॉम्तचे नाव अजरामर राहील.

## अभ्यासार्थ प्रश्न

(अ) दीर्घोत्तरी प्रश्न :

(१) समाजशास्त्राचे जनक म्हणून मान्यता पावलेल्या ऑगस्त कॉम्त यांचा जीवनवृत्तांत विशद करा.

(२) ऑगस्त कॉम्त यांनी सांगितलेला तीन अवस्थांचा अथवा मानवी प्रगतीचा नियम विशद करा.

(३) ऑगस्त कॉम्तच्या दृष्टिकोनातून समाजशास्त्राचे स्वरूप व व्याख्या स्पष्ट करा.

(४) समाजशास्त्राच्या अध्ययनाचे कॉम्तच्या विचारातील दोन दृष्टिकोन विशद करा.

(५) ऑगस्त कॉम्तचा प्रत्यक्षवाद स्पष्ट करा.

(६) ऑगस्त कॉम्तच्या समाजशास्त्रीय विचारांचे मूल्यांकन करा.

(ब) लघूत्तरी प्रश्न :

(१) समाजशास्त्राचा जनक म्हणून त्यांच्यावर पडलेल्या प्रभावांचे विवेचन करा.

(२) 'ऑगस्त कॉम्त हा समाजशास्त्रांचा जनक आहे' स्पष्ट करा.

(३) सर्ववस्तू चेतनावाद हा तीन अवस्थांतील नियमांच्या उपव्यवस्थेतील एक प्रकार सांगा.

(४) अनेकेश्वरवादावर टिपण लिहा.

(५) 'आध्यात्मिक अथवा अमूर्त अवस्था ही मानवी विचारांच्या उत्क्रांतीची दुसरी अवस्था होय' स्पष्ट करा.

(६) 'मानवी विकासाच्या प्रत्येक अवस्थेचा एका विशिष्ट सामाजिक संघटनेशी संबंध आहे' स्पष्ट करा.

(७) सामाजिक स्थितिशास्त्र.

(८) सामाजिक गतिशीलता.

(९) ऑगस्त कॉम्तप्रणित प्रत्यक्षवादाचा अर्थ सांगा.

(१०) कॉम्तच्या प्रत्यक्षवादी तत्वज्ञानाचे ध्येय सांगा.

(११) कॉम्तच्या प्रत्यक्षवादाचे टीकात्मक परीक्षण करा. ■